(११)

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्र निकेतनामधील यंत्रसामुग्री, संगणक व फर्निचर खरेदीच्या देयकांबाबत.

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक: नियत-२०१०/(८२/१०)/तांशि-३
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२
दिनांक : ३१ मार्च , २०१०

संदर्भ:-
१) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.जीटीआय-२००९/(७२/०९)/तांशि-३, दिनांक ९/२/२०१०
२) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.पुरमा-२००९/(६३/०९)/तांशि-३, दिनांक १८/२/२०१०
३) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.पुरमा-२००९/(१५२/०९)/तांशि-३, दिनांक १०/३/२०१०
४) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.पुरमा-२००९/(५८/०९)/तांशि-३, दिनांक १०/३/२०१०
५) संचालक, तंत्र शिक्षण, मुंबई यांचे पत्र क्र.११/डिटीई/देयके पारीत/२००९-२०१०/१५२१, दिनांक २६.३.२०१०

**शासन निर्णय:-** संदर्भाधिन अनुक्रमांक १ ते ४ येथील शासन निर्णयान्वये शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्र निकेतनंमध्ये यंत्र सामुग्री संगणक व फर्निचर खरेदी करण्यासाठी मंजूर झलेला निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. दिनांक ११.२.२००० च्या वित्त विभागाच्या परिपत्रकानुसार दिनांक १५ फेब्रुवारी नंतर कोषागारात देयके स्वीकारण्यात येत नाहीत. शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतनातील साहित्य खरेदीची प्रक्रिया वेळेवर पूर्ण होवू न शकल्याने साहित्य खरेदीची देयके दिनांक १५ फेब्रुवारीनंतर दिनांक ३१ मार्च पर्यंत कोषागारामध्ये स्वीकारण्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव संचालकांनी सादर केला होता. त्यास मान्यता देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

२. संदर्भाधिन अनुक्रमांक १ ते ४ नुसार होणारी खर्चाची देयके कोषागारात स्विकृत करण्यासाठी तसेच अभियांत्रिकी महाविद्यालये व तंत्रनिकेतने यांना अनुदानाचा विनियोग करणे शक्य व्हावे म्हणून वित्त विभागाचे शासन परिपत्रक दिनंक ११.२.२००० अन्वये आर्थिक वर्षाच्या शेवटी दिनांक १५ फेब्रुवारी नंतर खरेदी न करण्याची अट या शासन निर्णयान्वये शिथील करण्यात येत आहे.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ७७/१०/कोषा-प्र-५ दिनांक ३०.३.२०१० अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

( प्रकाश सुरवसे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालये (सर्व)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा ) महाराष्ट्र -मुंबई/ नागपूर
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
प्राचार्य, सर्व शासकीय तंत्र निकेतने (संचालकांमार्फत)
प्राचार्य, सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये (संचालकांमार्फत)
वित्त विभाग, (व्यय-५ व कोषा-५) मंत्रालय, मुंबई-३२
अवर सचिव (साशि-१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती/तांशि-३

D:\S D Jadhav\Tashi-३\Admin GR.doc